दाखल तारीख – १३.१०.२०२३
नोंदणी तारीख – १३.१०.२०२३
निकाल तारीख – ०९.०६.२०२६
कालावधी – वर्षे : महिने : दिवस
०२ : ०७ : २७

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायालयात**
**ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग**

(पिठासीन अधिकारी – जी.ए.कुलकर्णी)
(अधिघोषित दिनांक ०९.०६.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३२६/२०२३**
**निशाणी क्र. १६**

प्रथम खबर अहवाल क्रमांक–२४३/२०२३
कुडाळ पोलीस स्टेशन

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस निरीक्षक<br>कुडाळ पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्रीम.ए.डी.मिरजे |
| | **विरुध्द** |
| आरोपी | तुषार रमेश मोरजकर<br>वय– ३२ वर्षे, धंदा–मजुरी<br>रा.पिंगुळी मोरजकरवाडी<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री.एल.पी.मार्गी |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३.०८.२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | २३.०८.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १३.१०.२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २९.०२.२०२४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०८.०५.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ---- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९.०६.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | आरोपीस सुनाविण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | तुषार रमेश मोरजकर | सी.आर.पी.सी. ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | २९/०२/२०२४ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**-:: न्यायनिर्णय ::-**

**(दिनांक ०९.०६.२०२६ रोजी घोषीत)**

साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | दि.२३.०८.२०२३ रोजी १७.१० वाजण्याच्या सुमारास मौजे पिंगुळी, मोरजकरवाडी येथे आरोपी घराच्या बाजूला एका किलतानाच्या पिशवीमध्ये गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या १३३ सिलबंद बाटल्या, एका पुठ्ठयाच्या बॉक्समध्ये गोवा बनावटीच्या रोमन व्होडकाच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ४८ बाटल्या व एका पुठ्ठयाच्या बॉक्समध्ये गोवा बनावटीच्या हायवर्डच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ४८ बाटल्या अशी बेकायदेशीर दारु विक्री करणेच्या उद्देशाने विनापरवाना कब्जात बाळगलेल्या स्थितीत आढळून आला ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**–:: कारणमिमांसा ::–**

२. याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे एक साक्षीदार तपासला.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **नि.क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | भुषण भरमन्ना पवार | ११ | पंच साक्षीदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निशाणी पी–१ | पंचनामेवरील सही |

**ब) बचाव पक्ष :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :–**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**३.** आरोपीने त्याचे बचावासाठी स्वतःची अगर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही अगर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आरोपी विरुध्द पुरावा समोर न आलेने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे जबाब नोंदविणेत आलेला नाही.

**४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्रमांक १ करिताः–</u>**

**५.** अभियोग पक्ष साक्षीदार क्र. १ हे जप्ती पंचनामेवरील पंच साक्षीदार असून, त्यांनी त्यांचे सरतपासामध्ये ' दि.२३.०८.२०२३ रोजी ते कोठे हे त्यांना आठवत नाही. सदर दिवशी पोलिसांनी त्यांना कोठेही पंचनामा करण्यासाइी बोलाविले नव्हते. असे काही घडले नाही की, सदर दिवशी

पोलिसांनी त्यांना मौजे पिंगुळी, मोरजकरवाडी येथे दारूबंदी कायद्यांतर्गत छापा टाकून पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. अनुक्रमांक १ वर त्यांची सही आहे. त्यांनी निशाणी पी–१ वरील सही ओळखलेली आहे. परंतु त्यातील मजकुराविषयी त्यांना काही माहिती नाही' असा मजकूर कथन केलेला आहे. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत साक्षीदारास उलटतपास स्वरुपातील प्रश्न विचारुन जप्ती पंचनामा सिध्द करणेचा पुरेपुर प्रयत्न केला. तथापि, प्रस्तुत साक्षीदाराने जप्ती पंचनामा सिध्द होईल या आशयाची कोणतीही बाब या न्यायालयासमक्ष कथन अथवा मान्य केलेली नाही.

**६.** अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देवुन देखील अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अधिकारी तसेच अन्य साक्षीदार यांना तपासलेले नाही. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द दाखल केलेली फिर्याद सिध्द केलेली नाही. तसेच, तथाकथित जप्त मुद्देमाल या न्यायालयासमक्ष सादर करणेत आलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये केवळ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणेत आले म्हणुन अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत केला असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे आरोपीने गुन्हा केलेचे निष्पन्न होणेकरीता अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणे अत्यंत जरुरीचे आहे. तथापि, प्रस्तुतकामी अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेकरीता कोणतेही प्रयत्न केलेचे दिसून येत नाही. तसेच अभियोग पक्षाने जप्त केलेला मुद्देमाल व रासायनिक पृथक्करण अहवाल न्यायालयासमक्ष सादर केलेला नाही.

एकंदरीत अभिलेखावरील सर्व पुरावा विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवणेत आलेले आरोप हे निःसंशयपणे सिध्द केलेले दिसून येत नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष '***नकारार्थी***' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीताः</u>–**

**७.** मुद्दा क्रमांक २ चे निष्कर्षा करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी तुषार रमेश मोरजकर वय–३२ वर्षे, रा.पिंगुळी मोरजकरवाडी ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांची फौजदारी प्रक्रिया संहिता २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ मधील कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदारांचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

**४.** पोलीस निरीक्षक, कुडाळ पोलीस स्टेशन यांना याद्वारे निर्देशीत करणेत येते की, याकामी जप्त असलेला मुद्देमाल म्हणजेच एक हिरवट रंगाची किलतानाची पिशवीत बॉब्स लेमन वोडका असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या गोवा बनावटीच्या दारूने भरलेल्या १३३ सिलबंद प्लॅस्टीकच्या बाटल्या, रोमानोवा वोडका असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या गोवा बनावटीच्या दारूने भरलेल्या ४८ सिलबंद काचेच्या बाटल्या व हायवर्ड असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या गोवा बनावटीच्या दारूने भरलेल्या ४८ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या या मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकरिता निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कार्यालय सिंधुदुर्ग–आरोस यांचेकडे अपील कालावधीनंतर पाठविणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

दिनांक–०९.०६.२०२६.

[ जी.ए.कुलकर्णी ]
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ कुडाळ.